ISSN : 2278-5914

(Inst.Reg. No.Maharashtra/13482/Satara/2010)
Email ID : sisms2010@gmail.com

SATARA ITIHAS SANSHODHAN MANDAL, SATARA

# SANSHODHAN

PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

ISSUE - XIV



October 2023

Scanned with OKEN Scanner

# 20. भारतीय कामगार चळवळीमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे योगदान

प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर,
राधाबाई काळे महिला महाविद्यालय,
अहमदनगर.

लोकमान्य टिळक यांचे विचार हे आधुनिकतेला प्राधान्य देणारे, वास्तववादी आणि व्यावहारिकता यावर आधारित होते. स्वतः टिळक हे अर्थार्जनवादी होते. आर्थिक प्रश्नांबाबत टिळकांच्या भूमिका या अगदी स्पष्ट होत्या. १८९० साली 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'चा राजीनामा दिल्यावर त्यांना पैशांची चणचण भासू लागली. तेव्हा त्यांनी आपल्या घरी कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायद्याचे वर्ग सुरु केले. तसेच आर्थिक उत्पन्न वाढावे आणि स्वदेशीला प्रोत्साहन मिळावे म्हणून काही रक्कम गुंतवून दोन भागीदारांसह लातूर येथे सूतगिरणी सुरु केली.[१] शेतीसाठी त्यांनी साखर कारखाने, सूत उद्योग, विणकर यांचे प्रश्नावर जसे भाष्य केले. तसेच उद्योग क्षेत्र उभारावे म्हणून स्वदेशी बँक, स्वदेशी दुकाने, कौशल्य विकास प्रशिक्षण या गोष्टी फक्त सांगितल्या असे नाही तर त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सहकारी तत्त्वाचा विकास केला. याचमुळे केवळ शेतकरी वर्ग न राहता कामगार हा जातीविरहित नवा वर्ग भारतात निर्माण झाला होता.[२] थोडक्यात आर्थिक प्रश्नांना टिळकांच्या नेणीवेत महत्वाचे स्थान होते. अर्थार्जनाशिवाय जीवननिर्वाह अशक्य आहे याची त्यांना जाणीव होती. व याच जाणीवेतून आर्थिक प्रश्नांवर कामगारांचे संघटन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

२. **मार्क्सवादावरील लोकमान्य टिळकांचे भाष्य:** पी. सी. जोशी आणि के. दामोदरन हे आपल्या 'मार्क्स कम्स टू इंडिया' या ग्रंथात १९०३ पर्यंत मार्क्सचे नाव किंवा विचार पोहोचले नव्हते असे विधान करतात. या विधानाचा प्रतिवाद करताना जे. व्ही. नाईक यांनी लोकमान्य टिळकांना सर्वप्रथम कार्ल मार्क्स आणि त्याची वर्गसंघर्षाची संकल्पना १८८१ साली भारतात मांडण्याचे श्रेय दिले आहे.[३] 'रॅडिकल' या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या 'कामगार चळवळीचा वापर करण्याचे मार्ग' या शीर्षकाचा निबंध टिळकांनी १ मे, १८८१ च्या मराठा मध्ये पुनर्मुद्रित केला. त्या लेखासाठी टिळकांनी प्रस्तावनाही लिहिली होती. त्यात त्यांनी म्हटलं आहे की, "मानवी संस्कृतीच्या प्रगतीमध्ये जगातल्या अनेक अनिष्ट गोष्टी नाहीशा करायच्या बाकी आहेत. त्या दृष्टीने कार्ल मार्क्सचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' अतिशय महत्त्वाचा आहे. कामगारांचे भांवलदारांकडून होणारे निर्दयी शोषण व त्यातून निर्माण होणारा वर्गसंघर्ष याचे सखोल विश्लेषण मार्क्सने मार्मिकपणे केले आहे."[४] यातून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते की, टिळकांना वर्गीय जाणिवांचा परिचय लवकरच झाला व 'केसरी' आणि 'मराठा' सुरु झाल्यानंतर लगेचच कदाचित भारतात पहिल्यांदाच कार्ल मार्क्सच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'ची ओळख टिळकांनीच महाराष्ट्राला करून दिली. १८८१ साली ज्या काळात भारतात कम्युनिस्ट पार्टीचं नावही लोकांना माहीत नव्हतं, त्या काळात टिळकांनी सामान्य जनतेसमोर 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ठेवला. थोडक्यात मराठा आणि केसरी या वृतपत्रात लिहिलेल्या लेखांवरून लोकमान्य टिळकांना साम्यवादी विचारात रस होता हे स्पष्ट होते.

**३. कामगारांच्या प्रश्नासंबंधी कॉंग्रेसला वर्गीय आशय देण्याचा प्रयत्न:** लोकमान्य टिळकांचा सक्रीय राजकारणात सहभाग वाढल्यानंतर त्यांनी कॉंग्रेसला कामगारांच्या प्रश्नावर संघटित करण्याचा प्रयत्न केला. टिळक म्हणतात, "कॉंग्रेसची चळवळ तळागाळात पोहोचली तरच तिला खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक स्वरूप येईल आणि ती लोकचळवळ होईल. कॉंग्रेस जर जनतेची व्हावी असं वाटत असेल तर कामगार, कारागीर आणि सुशिक्षित वर्ग या सर्वांचा विचार करून त्यांच्यापर्यंत पोहोचल्याशिवाय कॉंग्रेसला अपेक्षित उद्दिष्ट गाठता येणार नाही. यात आपण बहुजनांचा विचार करत असलो तरी त्यामुळे कॉंग्रेसच्या मार्गात अडथळा येणार नाही. राजकीय चळवळी व कामगार चळवळी विभागता येत नाहीत, त्या एकमेकींना पूरक आहेत. हिंदी मजूर वर्गाला वगळून स्वातंत्र्य मिळवले तर फक्त गोरी नोकरशाही जाऊन काळी नोकरशाही येईल. व ते काही खरे स्वराज्य होणार नाही,"[५] असे टिळकांचे मत होते.

**४. कामगारांचे संघटन करण्यासाठी लोकमान्य टिळकांचे प्रयत्न:** राजकीय व आर्थिक हक्क गोडीगुलाबीने मिळत नाहीत. त्यासाठी संघर्ष करावा लागतो. कारण प्रस्थापित वर्ग आपले हक्क सहजासहजी सोडत नाही ही टिळकांची धारणा होती. टिळक हे राष्ट्रीय स्तरावरील पहिले राजकीय पुढारी होते, की ज्यांनी निरपेक्ष भूमिका घेऊन वर्गीय ऐक्य आणि कामगार संघटनेचे महत्व फार पूर्वीच ओळखले होते. म्हणूनच शेतकऱ्यांच्या प्रश्नांइतके कामगारांचे प्रश्न त्यांना तेवढेच जिव्हाळ्याचे वाटत होते. १९०६ साली लो. टिळकांनी कामगारांच्या हक्कासाठी सरकारविरुद्ध झगडण्यासाठी हिंदी मजुरांची एक मजबूत संघटना असावी असं सार्वजनिक सभेत सुचवलं होतं. टिळक म्हणतात, "२५ वर्षांपूर्वी समाज जागृती करणे हेच एक कर्तव्य आपल्या पुढाऱ्यांपुढे होतं. पण आजच्या काळात त्यांनी लोकांच्या मनोवृत्तीला योग्य वळण दिले पाहिजेत. आपल्याकडे धंदेवाल्यांच्या युनियन्स नाहीत. पोस्टमनची एखादी युनियन असती तर त्यांचे म्हणणे कबूल झाले असते, त्यांचा नुकताच झालेला संप हा त्यांची युनियन नसल्यामुळे अयशस्वी झाला. भांडवलदार व मजूर यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यास पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये संप होतात. मजुरांचे मालकांशी काही वैर नसते. परंतु, पोटाला भरपूर मिळावे म्हणून तेथील कामगार रुसतो, संप करतो आणि त्यांची युनियन असल्यामुळे कारखानदारांना त्यांचे म्हणणे मान्य करावे लागते. संप करणे म्हणजेच रुसून बसणे हा काही गुन्हा नव्हे, आपले म्हणणे मान्य करून घेण्यासाठी कामगारांनी संप केले पाहिजेत ह्या मताचे टिळक होते. १९०७ मध्ये अशाच एका प्रसंगी ते म्हणाले होते राजकीय प्रश्न लष्करी सत्तेने दडपता येत असले तरी पोटापाण्यासाठी करावे लागणारे संप असे दडपता येत नाहीत. १९ जून १९०७ च्या केसरी मध्ये टिळकांनी 'रेल्वे युनियन' या मथळ्याचा एक लेख लिहिला होता. त्यात लिहिलं आहे की आजच्या काळात पाश्चात्यांच्या धर्तीवर भारतात युनियन संघटित करून ती चालवण्याची अत्यंत गरज आहे. रेल्वे खात्यात मोठ्या संख्येने असलेल्या हिंदी नागरिकांनी ठरवले तर अशा तऱ्हेने एकजूट करून युनियन चालवणे त्यांना सहज शक्य आहे. राजद्रोहाच्या आरोपाखाली इ.स. १९०८ साली लोकमान्य टिळकांना अटक होण्यापूर्वीच मुंबईच्या कामगारांना संघटनेचे महत्त्व त्यांनी पटवून दिले होते. यातूनच लक्षात येत की कामगार संघटनांच्या आणि त्यांच्या हक्कांबाबत टिळक किती आग्रही होते. भारतीय कामगार चळवळीचा नोकरशाहीला विरोध हा स्वराज्य संपादनाचा एक मार्ग आहे, असे धोरण टिळकांनी १८९० मध्येच निश्चित केले होते, आणि म्हणून लाला लजपतराय यांनी लोकमान्य टिळकांबद्दल "Tilak's return to

India, it might be said as a nationalist labor leader." असे उद्गार काढले होते.[६] थोडक्यात कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना राष्ट्रीय व्यासपीठावर मांडून कॉंग्रेसला वर्गीय आशय देण्याचा टिळकांचा प्रयत्न होता.

लो. टिळकांना परदेशातील व भारतातील कामगार चळवळीमधील फरक माहित होता. कारण, पाश्चात्य देशांमध्ये वर्गसंघर्ष होता, तर भारतात प्रामुख्याने जातीसंघर्ष दिसून येत होता. त्यामुळे भारतातल्या लोकांचा विचार करताना त्यांच्यामध्ये असलेल्या या भेदाचाही विचार करणं आवश्यक होतं असे टिळकांचे मत होते. सन १८९२ मध्ये औद्योगिक परिषदेत टिळकांनी एक निबंध वाचला होता, त्यात त्यांनी जातीव्यवस्थेबाबत म्हटलं आहे की, 'पारंपरिक व्यवसाय टिकवून धरण्यासाठी आणि परस्पर मदतीचा उद्देश पूर्ण व्हावा म्हणून आर्यवंशीयांनी निधर्मी आणि सामाजिक संघटन या दृष्टीने जातींकडे पहिले पाहिजे. कामगार वर्गाची नैतिक आणि ऐहिक स्थिती उंचावण्याची जातीव्यवस्थेचा वापर वापर हिंदूंनी केला पाहिजे,' असं मत त्यांनी त्यामध्ये व्यक्त केलं होतं.[७]

५. **कामगारांच्या प्रश्नासंबंधी लो. टिळकांची भूमिका:** लो. टिळकांना अपेक्षित कामगार चळवळ ही मजूरांना, कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी जागृत करणारी होती. सन १८९० मध्ये मुंबईतील म्युनिसिपल सफाई कामगारांनी काम बंद केले असता टिळकांच्या केसरी वृत्तपत्राने कामगारांची बाजू उचलून धरली. १८९९ मध्ये जी. आय. पी. रेल्वेच्या तार मास्तरांनी संप पुकारला असता केसरीने या संपावेळी कामगारांना पाठिंबा दिला. सन १९०३ मध्ये चहाच्या मळ्यातील कामगारांविरुद्ध आणलेल्या प्लॅन्टर लेबर बिलाला केसरीने कडवा विरोध दर्शविला होता. अशा विषयांमध्ये टिळक नेहमी कामगारांच्या बाजूने उभे राहत असत.[८] स्वदेशी चळवळीच्या काळात टिळकांनी १९०६ मध्ये मुंबईत भारतीय कामगारांच्या द्वारे उत्पादित मालाला चालना मिळावी यासाठी एक सहकारी स्वदेशी भांडार सुरु केले. त्याचे नाव 'बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर' असे होते. टिळक आणि जमशेदजी टाटा यांच्या संकल्पनेतून या संस्थेची स्थापना झाली होती. टिळक त्याचे एक संचालक होते. पण मुंबईतील गिरणी मालकांनी याचा गैरफायदा घेऊन कापडाचे दर वाढवले, ज्याचा स्वदेशी चळवळीवर विपरीत परिणाम झाला. यामुळे टिळक आणि वासुदेव गणेश जोशी दर आठवड्याला मुंबईला जाऊन दर कमी करण्याबाबत गिरणी मालकांशी बोलणी करत असत. परंतु मालक लोक तयार नव्हते.[९] धनंजय कीर यांच्या चरित्रात उल्लेख केल्यानुसार टिळकांना दर आठवड्याला या एका कामासाठी सतत मालकांच्या घरी जाऊन जोडे झिजवावे लागत होते. काही मालकांकडून मानहानीची बोलणी ऐकून घ्यावी लागली तर काहींनी टाळाटाळीची उत्तरं ही ऐकवली.[१०] यातूनच भारतीय गिरणी मालकांची भारतीय कामगार, स्वदेशी चळवळीबाबतची अनास्था व भांडवलदारधार्जिण्या प्रवृत्तीचे दर्शन होते. भांडवलदार मग तो परकीय असो नाहीतर भारतीय, तो स्वहितासाठी कोणतीही तडजोड करत नाही हेच टिळकांच्या स्वदेशी सहकारी भांडार प्रकरणावरून दिसून येते. १९०७ साली सुरत येथे कॉंग्रेसचे अधिवेशन होते. सुरतेला निघण्यापूर्वी टिळकांचे चिंचपोकळी या मुंबईतील कामगार वस्तीत टिळकांचे भाषण झाले होते. त्यात त्यांनी स्वदेशी चळवळ ही कामगारांच्या हिताची आहे हे संगितले. स्वदेशीचा वापर वाढला तर गिरण्यांमधील काम वाढेल, त्यामुळे कामगारांचं काम वाढेल आणि त्याचा कामगारांनाच फायदा होईल, हेच स्वदेशी चळवळीचे उद्दिष्ट आहे. कामगारांनी आपल्या फायद्यासाठी दारू पिणे बंद करावे असाही सल्ला त्यांनी दिला. ६

जून व ७ जून १९०८ रोजी चिंचपोकळीतच टिळकांनी दोन सभांमध्ये भाषणे केली. गिरणी कामगारांनी आणि त्यातही जॉबर आणि हेडजॉबर लोकांनी गिरणी कामगारांच्या कमिट्या बनवून त्याद्वारे त्यांच्यामध्ये पसरत असलेल्या दारू पिण्याच्या वृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे असं टिळकांनी सांगितलं.[११] टिळक म्हणतात, "सन १९०६ व १९०७ मध्ये मजूर वर्गामधे फैलावत असलेल्या दारूच्या व्यसनापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी मद्यपान निषेधाची मोठी चळवळ मी महाराष्ट्रभर केली; परंतु सरकारकडून त्या चळवळीला अडथळा आणण्यात आला. मजूर लोकांची स्थिती सुधारावी, अशी माझी फार इच्छा आहे. मुंबई मजूर लोकांची आहे. आपली कोकणातील घरेदारे सोडून मुंबईत येऊन राहण्यावरच मुंबईतील श्रीमंती अवलंबून आहे. तेव्हा मजुरांनी दुःखामध्ये काळ लोटलेला पाहणे कोणाला बरे आवडेल? औद्योगिक बाबतीत निकृष्टावस्थेत पोहोचलेल्या आपल्या देशामध्ये नुकत्याच कोठे जन्मास आलेल्या कारखाने व गिरण्यांना परदेशातील राजसत्तेचे ज्यांना पाठबळ आहे अशा कारखान्यांशी स्पर्धा करावयाची आहे. मजूर आणि भांडवलवाले यांच्यातील लढा आणि संपत्तीची अयोग्य वाटणीं नाहीशी करणे आवश्यक आहे."[१२] थोडक्यात सामाजिक जाणीव व नेणीवेतून लोकमान्य टिळकांनी कामगारांच्या प्रश्नांना हात घालतांना व्यसनाधिनतेपासून कामगारांनी दूर राहावे यासाठी ही प्रयत्न केल्याचे दिसते.

दि. २५ सप्टेंबर १९१९ रोजी इंटरनॅशनल ब्रदरहुड वेलफेअर असोसिएशनच्या लंडन शाखेचे उदघाटन होणार होते. अमेरिकेतील मजूर व इंग्लंडमधील मजूर एकत्र आणण्याच्या उद्देशाने या आंतरराष्ट्रीय मजूर संघाने लंडन येथे सभा भरवली होती. हिंदी मजुरांनीही या आंतरराष्ट्रीय संघटनेत सामील व्हावे म्हणजे कामगारांचे हक्क प्रस्थापित करण्यास मदत होईल म्हणून लोकमान्य टिळक व डॉ. वेलकर यांना विशेष आमंत्रण होते. या दोघांनाही सभेच्या दिवशी व्यासपीठावर बसवण्यात आले. त्या दोघांचीही भाषणे त्या वेळी झाली. टिळक म्हणाले, "हिंदुस्थानातील मजुरांची चळवळ अजून बाल्यावस्थेत आहे. ती जेव्हा सर्व देशात भव्य स्वरूपात होईल त्या वेळी नक्की येथील मजुरांच्या चळवळीवर हुकूम झालेली दिसून येईल व जागतिक संघटनेशीही सहकार्य करेल."[१३]

६. लोकमान्य टिळकांप्रति कामगारांची आस्था: कामगारांच्या प्रश्नांबाबत लो. टिळकांनी दाखवलेल्या आपुलकीमुळे कामगारांनीही त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा दिला. जनसंघटन करण्यासाठी लो. टिळकांनी मुंबई मध्ये सुरु केलेला गणेशोत्सव कामगार वर्गात खूप लोकप्रिय झाला होता. त्यामुळे टिळकांच्या सभांना कामगारांची लक्षणीय संख्या होती. त्यातच बंगालच्या फाळणीनंतर ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाला शह म्हणून सुरु झालेल्या स्वदेशी व बहिष्कार चळवळीला कामगारांनी लक्षणीय प्रतिसाद दिला. लो. टिळकांची कामगार वर्गामध्ये लोकप्रियता वाढू लागली होती. त्यामुळे टिळकांना हद्दपार करण्याचे कारस्थान ब्रिटिशांनी रचले. केसरी मधून लो. टिळकांनी १९०८ साली लिहिलेल्या ४ लेखांमधून ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनमाणसामध्ये असंतोष निर्माण होईल असे लिखाण केल्याबद्दल न्यायमूर्ती दावर यांनी २२ जुलै, १९०८ रोजी टिळकांना सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली. सूडभावनेने टिळकांना ही शिक्षा सुनावली त्यामुळे मुंबईच्या २ लक्ष कामगारांनी सहा दिवसांचा संप पुकारला. भायखळा, परळ वगैरे भागातील बहुतेक लोक या बातमीमुळे गिरणी कामगार कामावर गेले नाहीत, त्यातून काही गिरण्या बंद पडल्या. फक्त कामगारांनीच नाही, तर मध्यमवर्गीयांनी, दुकानदारांनी आणि व्यापाऱ्यांनीही हरताळ पाळला. सर्व बाजार बंद झाले. यामुळे पोलीस आणि

लष्कराला पाचारण केले गेले. शांततापूर्ण चाललेल्या संपाला पोलिसांनी हिंसक वळण दिले. त्यात १५ लोक गोळीबारात मरण पावले आणि ३८ लोक जखमी झाले.[१४] या संपाची माहिती रशियातील कामगार नेता लेनिन याला समजली तेव्हा तो म्हणाला, "हिंदुस्थानी कामगारांचा हा पहिलाच राजकीय संग्राम असून तो उज्ज्वल भविष्यकाळाचा निर्देशक आहे, मी ह्याचे स्वागत करतो."[१५] लो. टिळकांचे एक चरित्रकार ग. त्र्यं. बापट यांच्या म्हणण्यानुसार कामगारांचा हा संप, आक्रोश म्हणजे टिळकांनी मजूर वस्तीत जाऊन व्याख्याने देऊन जी जागृती केली होती तिचा हा परिणाम होता. टिळकांच्या पहिल्या राजद्रोहाच्या खटल्यानंतरही असाच संप गिरणी कामगारांनी केला होता.

१० जून, १९१८ रोजी मुंबई सरकारने तेथील टाऊन हॉलमध्ये युद्धपरिषद भरवली होती. त्या सभेला केलेल्या भाषणात टिळकांनी स्वराज्याचा उल्लेख केला. हे ऐकून उपस्थित असलेल्या राज्यपाल लॉर्ड विलिंग्डन याने चालू भाषणात हस्तक्षेप करून टिळकांना थांबवले. एक प्रकारे हा लो. टिळकांचा अपमान होता. त्याचा सूड कामगारांनी लवकरच घेतला. १९१८ च्या वर्षाअखेर राज्यपाल विलिंग्डन सेवानिवृत्त होऊन आपल्या मायदेशी परतणार होता. इंग्रजनिष्ठ असलेल्या काही भारतीयांनी सेवानिवृत्त होणाऱ्या लॉर्ड विलिंग्डनचा सत्कार करून त्यांना मानपत्र द्यावे असे ठरवले आणि विलिंग्डन स्मारक मुंबईत व्हावे म्हणून एक सभा ११ डिसेंबर १९१८ ला त्याच टाऊन हॉलमध्ये भरविली. या स्मारकाला विरोध करण्यासाठी तेथे मोठी झाली. या गर्दीला विरोध करण्यासाठी मवाळ गटाने मोठ्या प्रमाणात गिरणी कामगार बोलावले होते. पण ज्याने टिळकांचा अपमान केला त्या विलिंग्डन स्मारकासाठी ही सभा आहे हे समजल्यावर एकाएकी सगळे कामगार उलटले आणि स्वराज्यवादी गटात सामील होऊन त्यांनी ही सभा उधळून लावली.[१६] विलिंग्डन याने केलेला टिळकांचा अपमान मुंबईकर विसरले नव्हते व त्यांनी ही सभा रद्द करावयास लावून लो. टिळकांवरील आपले प्रेम दाखवून दिलेचे वरील घटनेवरून दिसून येते.

टिळक हे कामगारांना जनसंघटनेचे महत्व सतत पटवून देत असत. २९ नोव्हेंबर १९१९ रोजी एलफिन्स्टन मैदानात उपस्थित कामगारांच्या समुदायास उद्देशून लोकमान्यांनी सांगितलं, "मी इंग्लंडच्या कामगारांतर्फे तुम्हाला एक संदेश आणला आहे व तो म्हणजे तुम्ही तुमची ट्रेड युनियन कायम करा. तुमच्या युनियन्स जितक्या मजबूत राहातील तितक्याच प्रमाणात तुमचे हक्क तुम्हाला मिळतील."[१७] लंडन येथील आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत भारतीय कामगारांचे प्रतिनिधी म्हणून लोकमान्य टिळकांची निवड झाली. या निमित्ताने २ डिसेंबर १९१९ रोजी लोकमान्यांचा गिरणी कामगारांनी सत्कार केला. या सत्कारप्रसंगी कामगारांना उद्देशून लोकमान्य म्हणाले, "तुमचा मार्ग अवघड आहे. संकटांचा आहे पण तुम्ही युनियन्स निर्माण करा. तुम्ही युनियन्स निर्माण केल्या म्हणून तुम्हाला तुरूगात जावे लागेल. पण त्याला घाबरू नका. संकटे सोसल्याशिवाय हक्क मिळत नसतात. तुम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे की सर्व कामगार मग ते हिंदू, मुसलमान किंवा ख्रिश्चन, बाम्हण-ब्राम्हणेतर सर्व एक आहेत व एकच असले पाहिजे. पाश्चिमात्त्य राष्ट्रातून कामगार संघटीत झाले आहेत आणि तिकडेच मजूर मालक झालेले आहेत."[१८] थोडक्यात लोकमान्य टिळकांच्या विचारांच्या वारशामधून भारतीय कामगार चळवळीची जडणघडण झाली. पुढील काळात भांडवलवादी विचारांच्या सरकारशी कामगार वर्गाने जो जातीय व वर्गीय अंगाने संघर्ष केला त्यामध्ये टिळकांच्या विचारांचा मोठा वाटा होता. त्यामुळे कामगार ही टिळकांना आपला नेता मानत असत. दिवाण चमनलाल, कॉम्रेड श्रीपाद



Scanned with OKEN Scanner

अमृत डांगे हे कामगार वर्गातून पुढे आलेले कामगारांचे पुढारी सुद्धा टिळकांचे भक्त होते. १९२० च्या सुरुवातीला कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे टिळकांकडे मार्गदर्शनासाठी गेलेले असताना टिळकांनी त्यांना ट्रेड युनियन्समध्ये काम करण्याचा व आयटकचे अधिवेशन घेण्यास मदत करण्याचा सल्ला दिला असे कॉ. डांगे यांनी आयटकच्या इतिहासाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे.

**संदर्भसूची:**


१. वेलकर प्रताप, लोकमान्य टिळक आणि डॉक्टर वेलकर, श्रीविद्या प्रकाशन, मुंबई, १ जानेवारी २०१७, पृ.क्र. १४.

२. https://www.jagranjosh.com/general-knowledge/history-of-the-working-class-movement-in-british-india-1518007920-1, last seen at 7.15 pm dated 21/08/2023.

३. www.epw.in/Perspectives/lokmanya-tilak-karl-marx-and-class-conflict.html, last seen at 2.00 pm 21/08/20123.

४. दैनिक तरुण भारत, वर्ष ७३ वे, दि. ३१ जुलै २०२०, पान नंबर ०४.

५. https://maharashtratimes.com/editorial/column/kalthase/the-father-of-the-indian-labor-movement/articleshow/88410231.cms, last seen at 8.00 pm dated 21/08/2023.

६. http://210.212.169.38/xmlui/bitstream/handle/123456789/14486/Tilak%20ani%20kamgar%20chalval.pdf?sequence=1&isAllowed=y, last seen at 3.30. pm dated 22/08/2023.

७. Keer Dhananjay, Lokmanya Tilak, *Popular Prakashan Ltd.* Bombay, 1 January 1959, p. 88

८. वेलकर प्रताप, अव्यक्त लोकमान्य, टिळक स्मारक ट्रस्ट, पुणे. का.ना. पृ. क्र. २६.

९. https://en.wikipedia.org/wiki/Vasukaka_Joshi, last seen at 6.00. pm dated 23/08/2023.

१०. Keer Dhananjay, Lokmanya Tilak, Op. cit p. 96.

११. दैनिक तरुण भारत, वर्ष ७३ वे, दि. ३१ जुलै २०२०, पान नंबर ०५.

१२. http://210.212.169.38/xmlui/bitstream/handle/123456789/14486/Tilak%20ani%20kamgar%20chalval.pdf?sequence=1&isAllowed=y, last seen at 5.30. pm dated 22/08/2023.

१३. डांगे श्रीपाद अमृत, क्रांतिकारक कामगार व लोकमान्य टिळक, लोकवांङमय गृह, मुंबई, १९७६, पृ.क्र. ५८.




Scanned with OKEN Scanner

१४. लाड श्रीकांत (संपा.), "भारतीय कम्युनिस्ट पक्षाची ५० वर्षे", भारतीय कम्युनिस्ट पक्ष प्रकाशन, मुंबई, जानेवारी १९७६, पृ.क्र. ११.

१५. उद्धृत, डांगे श्रीपाद अमृत, क्रांतिकारक कामगार व लोकमान्य टिळक, लोकवांडमय गृह, मुंबई, १९७६, पृ.क्र. ६४.

१६. दैनिक तरुण भारत, वर्ष ७३ वे, दि. ३१ जुलै २०२०, पान नंबर ०५.

१७. उद्धृत, डांगे श्रीपाद अमृत, क्रांतिकारक कामगार व लोकमान्य टिळक, लोकवांडमय गृह, मुंबई, १९७६, पृ.क्र. ६६.

१८. जोग वि.स, भारतीय कम्युनिस्ट, लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृती, १९९२, पृ.क्र.३.



Scanned with OKEN Scanner